स्थायी समितीच्या शुक्रवार दिनांक 24–03–2017 रोजी दुपारी 03–00 वाजता सिव्हील कार्यालयातील डॉ. पंजाबराव देशमुख स्मृति, स्थायी समिती सभागृहात भरलेल्या सभेचा अहवाल.

## उपस्थित सभासद

| | | |
|---|---|---|
| 1. | श्री. संदिप चंद्रभान जाधव | सभापती |
| 2. | श्रीमती संगीता दिपक गिऱ्हे | सदस्या |
| 3. | श्रीमती रिता अशोक मुळे | सदस्या |
| 4. | श्रीमती उषा टॉबी पॅलट | सदस्या |
| 5. | श्रीमती भाग्यश्री गणेश कानतोडे | सदस्या |
| 6. | श्रीमती नेहा नरेन्द्र वाघमारे | सदस्या |
| 7. | श्रीमती सरला कमलेश नायक | सदस्या |
| 8. | श्रीमती मनिषा सुनिल कोठे | सदस्या |
| 9. | श्रीमती सरिता ईश्वर कावरे | सदस्या |
| 10. | श्रीमती लता सुनिल काडगाये | सदस्या |
| 11. | श्रीमती जयश्री मोहन वाडीभस्मे | सदस्या |
| 12. | श्री. जितेन्द्र भास्कर घोडेस्वार | सदस्य |
| 13. | श्री. हरीश मोहन ग्वालबंशी | सदस्य |
| 14. | श्रीमती अंसारी सय्यदा बेगम मो.निजामुद्दीन | सदस्या |
| 15. | श्री. मनोज दशरथ सांगोळे | सदस्य |

## अनुपस्थित सभासद

| | | |
|---|---|---|
| 1. | श्रीमती दुर्गा चंद्रभुषण हत्तीठेले | सदस्या |

## उपस्थित अधिकारी

1. श्री. रविन्द्र कुंभारे, अति. आयुक्त
2. श्री. हरीश दुबे, निगम सचिव

ठराव क्रमांक 07ः– {आस्थापना}

शासन निर्णय क्र.: संकीर्ण –2715/प्र.क्र. 100/13 दि. 8 जानेवारी, 2016 अन्वये सेवानिवृत्त अधिकारी/कर्मचारी यांच्या सेवा करार पध्दतीने विवक्षित कामासाठी घेणेसंदर्भात सूचना आहेत. याअनुषंगाने विशेष कार्य अधिकारी (चौकशी) हे पद सेवानिवृत्त अधिका–यांमधून भरण्याकरिता जाहिरातीव्दारे अर्ज मागवून, प्रत्यक्ष मुलाखती घेवून निवड करण्यात येणा–या सेवानिवृत्त उमेद्वाराला विशेष कार्य अधिकारी (चौकशी) या पदावर प्रथमतः 12 महिन्याकरिता व तद्नंतर 2 वर्षाच्या कालावधीकरिता असे एकूण 3 वर्षाचे कालावधीकरिता, मासिक पारिश्रमिक तत्वावर नियुक्त

करण्याचा प्रश्न समितीने विचारात घेऊन म.न.पा. च्या ईतर विभागात वेगवेगळया कार्याकरिता विशेष कार्य अधिकारी हे पद भरावयाचे असल्यास म.न.पा. सेवेतून निवृत्त झालेल्या अधिकाऱ्यांतून याच तत्वावर भरण्यात यावे. तसेच प्रशासनाने निवड करण्यांत आलेल्या उमेदवाराचे नांव स्थायी समिती कडून कायम करण्याच्या अटीवर व वरिल सुचनेसह विषयास समितीने एकमताने मंजूरी प्रदान केली.

ठराव क्रमांक 08ः— {नगर रचना विभाग} मौजा — चिंचभुवन व मौजा — हुडकेश्वर (बु.), नरसाळा येथे नगररचना परियोजना तयार करण्याकरीता एकुण आठ (8) संस्थेची पात्रता सुची (Empanellment) करण्यास मा. आयुक्त महोदय यांनी दि. 07.12.2016 रोजी मंजुरी प्रदान केलेली असून या क्षेत्राकरीता नगर रचना परियोजना (T.P.Scheme) तयार करणेस्तव पात्रता सुचितील संस्थांकडून मोबदला शुल्क आकारण्याबाबत प्रस्ताव मागविण्यात आलेले होते. निवड सुचीमधील सर्व संस्थांकडून मोबदला शुल्क आकारणीबाबतचे प्रस्ताव प्राप्त झालेले असून प्राप्त प्रस्तावांचा तुलनात्मक तक्ता तयार करण्यात आलेला असून नस्तीत संलग्न आहे.

तुर्तास मौजा — हुडकेश्वर (बु.) व नरसाळा या क्षेत्राकरीता नगर रचना परियोजना (T.P.Scheme) तयार करण्याचे प्रस्तावित असून, तुलनात्मक तक्त्यानुसार Designe Point Consult Pvt. Ltd. 607-610, ‘B’ wing Tirupati Plaza Athgate, Surat, Ahmadabad यांनी खालीलप्रमाणे निम्नतम मोबदला शुल्काचा प्रस्ताव दिलेला आहे.

मौजा — हुडकेश्वर (बु.) क्षेत्र — 313.46 हे.आर. करीता रू. 5500/— प्रति हे.आर. प्रमाणे एकुण रू. 17,24,030/— आणि मौजा — नरसाळा क्षेत्र — 297.61 हे.आर. करीता रू. 5,900/— प्रति हे.आर. प्रमाणे एकुण रू. 17,55,899/— याप्रमाणे एकुण रू. 34,79,929/— या व्यतिरीक्त देय असलेला सेवा कर याप्रमाणे मोबदला शुल्क संबंधीत संस्थेने आकारलेले आहे.

मौजा — हुडकेश्वर (बु.)व नरसाळा या क्षेत्राकरीता महाराष्ट्र प्रादेशिक नियोजन व नगर रचना अधिनियम 1966 चे कलम 26 अंतर्गत प्रारूप विकास योजना प्रसिध्द् करण्यात आलेली असून, उक्त नकाशात दर्शविल्याप्रमाणे क्षेत्र 611.07 हे.आर. करीता नगर रचना परियोजना तयार करणेस्तव एकुण रू. 34,79,929/— या व्यतिरीक्त देय असलेला सेवा कर याप्रमाणे Design Point Consult Pvt. Ltd. यांना मोबदला शुल्क देणेस्तव मा. स्थायी समितीची मंजुरी देण्याचा प्रश्न समितीने विचारात घेऊन मौजा चिचभूवन हा स्मार्ट सिटीमध्ये समाविष्ठ करण्यांत आला आहे का ? हि बाब प्रशासनाने तपासावी तसेच मौजा हुडकेश्वर (बु.) नरसाळा यांच्या विकास आराखडयांत पूर्वी नियुक्त करण्यांत आलेल्या निविदा काराने नगररचना परियोजना काही प्रमाणात समाविष्ठ केल्या आहे का ? या बाबतची तपासणी

करुन योग्य प्रस्ताव स्थायी समिती कडे परत सादर करावा यासह विषय कार्यालयास परत करण्यास समितीने एकमताने मंजूरी प्रदान केली.

ठराव क्रमांक 09ः– कर विभागाच्या व इतर महसुली विभागांच्या वसुलीबाबत माहिती आणि चर्चेची समितीने नोंद घेतली.

ठराव क्रमांक 10 ः– आजच्या सभेची कार्यवाही कायम करण्यास समितीने एकमताने मंजुरी प्रदान केली.

यानंतर मा. सभापती स्थायी समिती यांनी सभेची कार्यवाही अनिश्चित काळाकरिता स्थगित केली.

निगम सचिव
महानगरपालिका,नागपूर

सभापती
स्थायी समिती,
महानगरपालिका,नागपूर